सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग

दुरध्वनी क्र. ०२२ २२६२०१११, विस्तारीत क्र. ७०४. कक्ष -९ (कनिष्ठ आस्थापना/भरती कक्ष), नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला,
ई-मेल – desk9recruitcell.mum@mahapolice.gov.in पोलीस आयुक्त कार्यालय, डी.एन.रोड, बृहन्मुंबई – १

जा.क्र.पोआ/कक्ष-९(पोभ)/९(१)/९९०८/२०२४, दि. ०५/०८/२०२४.

# मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती – २०२२-२३

विषय : - मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती – २०२२-२३
विविध कारणांनी गैरहजर असलेल्या उमेदवारांना शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणी प्रक्रियेसाठी शेवटची संधी देण्याबाबत.

संदर्भ :- क्र.अपोमसं/प्रशिक्षण/पो.शि.भरती २०२२-२३/१७३/२०२३, दिनांक ०६/०६/२०२४.

मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती – २०२२-२३ ची शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणी प्रक्रिया लोहमार्ग पोलीस, कवायत मैदान, घाटकोपर (पूर्व) या मैदानावर दिनांक १९/०७/२०२४ रोजी पासून सुरु करण्यात आली आहे. मुंबई पोलीस शिपाई (चालक) पदाच्या पुरुष उमेदवारांची शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणी प्रक्रिया दिनांक १०/०८/२०२४ रोजी संपणार आहे.

दिनांक १९/०७/२०२४ ते ०९/०८/२०२४ या कालावधीत जे पुरुष उमेदवार वैद्यकीय/अतिवृष्टी/इतर ठिकाणी परिक्षा इत्यादी कारणास्तव गैरहजर राहिले आहेत/राहतील अशा सर्व पुरुष उमेदवारांना दिनांक १०/०८/२०२४ रोजी शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणी प्रक्रियेसाठी शेवटची संधी देण्यात येत आहे. तसेच यापूर्वी गैरहजर असलेल्या ज्या उमेदवारांनी एक संधी मिळण्याची विनंती केली आहे अशा उमेदवारांना देखील दिनांक १०/०८/२०२४ रोजी शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणी प्रक्रियेसाठी उपस्थित राहण्याबाबत सुचित करण्यात येत आहे. त्यानंतर कोणत्याही उमेदवारांची विनंती विचारात घेतली जाणार नाही.

सर्व संबंधित उमेदवारांनी मैदानी चाचणी व शारिरीक मोजमाप प्रक्रियेकरिता मैदानी चाचणीचे ओळखपत्र तसेच इतर ओळखपत्र (आधार कार्ड/चालक परवाना/पॅनकार्ड इ.) घेऊन वेळेत उपस्थित राहावे. या आस्थापनेवरील भरती प्रक्रियेची मैदानी चाचणी (Synthetic track) वर घेण्यात येत असल्याने कोणत्याही उमेदवारांस **स्पाईक शुज** (Spike shoes) **वापरता येणार नाही. Synthetic track वर कुठलीही अडचण निर्माण होणार नाही, याप्रमाणे Sports shoes वापरावे.**

सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

पोलीस आयुक्त मुंबई

**( नवनाथ ढवळे )**
पोलीस उप आयुक्त (मुख्या-२)
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय.